जलद प्रतिसाद पथक,मुंबई करिता उपलब्ध मनुष्यबळातुन स्वतंत्र आस्थापना निर्माण करण्यास तसेच पोलीस उप आयुक्त,जलद प्रतिसाद पथक यांना “कार्यालय प्रमुख” व त्यांच्या अधिनस्त प्रशासकीय अधिकरी यांना“आहरण संवितरण अधिकारी” म्हणुन घोषित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः अेपीओ-३११९ /प्र.क्र.६४ /पोल-३
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, २ रा मजला, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०६ जुलै, २०१९

वाचा:

१. गृह विभाग, शासन निर्णय क्र. एसएसए-१००९/प्र.क्र.३७७/विशा-४, दि.३१.०८.२००९.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे पत्र क्र.३६९/पोआ/वाचक/QRT/२०१९, दि.१३.०५.२०१९.

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथील नमूद दि.३१.०८.२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुंबई मध्ये दि.२६.११.२००८ रोजी अतिरेक्यांनी केलेल्या दहशतवादी हल्याच्या पार्श्वभूमीवर अशा प्रकारच्या दहशतवादी हल्याचा मुकाबला करण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर मुंबई शहर पोलीस दलात पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई कार्यालयाच्या आस्थापनेवर २६ जलद प्रतिसाद पथके निर्माण करण्यात आली आहेत. सदर २६ जलद प्रतिसाद पथकासाठी अधिकारी/कर्मचारी संवर्गातील एकूण १३७८ पदे मंजुर केली आहेत. सद्यस्थितीत १५ जलद प्रतिसाद पथके कार्यरत असून सदर पथकासाठी अधिकारी/कर्मचारी संवर्गातील एकूण ८५२ इतके मनुष्यबळ कार्यरत आहे. सदर जलद प्रतिसाद पथकातील अधिकारी/कर्मचा-यांचे आस्थापनाविषयक कामकाज पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांच्या अधिनस्त विविध विभागीय कार्यालयामार्फत करण्यात येत असलयाने सदर कर्मचा-यांच्या सेवाविषयक बाबीच्या नोंदी घेण्यास प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्याने विलंब होतो. परिणामी सदर पथकातील कर्मचा-यांचे दैनदिन कामाकाजावर याबाबीचा विपरीत परिणाम होत आहे. जलद प्रतिसाद पथकाची भविष्यकालीन वाढणारी क्षमता लक्षात घेता जलद प्रतिसाद पथकाची आस्थापना स्वतंत्र व एकाच कार्यालयात असणे अत्यावश्यक आहे.

उपरोक्त संदर्भाधिन क्र.२ येथील नमूद दि.१३.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांनी पोलीस उप आयुक्त,जलद प्रतिसाद पथक यांचे अधिनस्त जलद प्रतिसाद

पथकासाठी पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांचे आस्थापनेवर स्वतंत्र आस्थापना निर्माण करण्याची तसेच पोलीस उप आयुक्त,जलद प्रतिसाद पथक यांना "कार्यालय प्रमुख"व त्यांच्या अधिनस्त प्रशासकीय अधिकारी यांना " आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्याची विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

पोलीस उप आयुक्त,जलद प्रतिसाद पथक यांचे अधिनस्त जलद प्रतिसाद पथकासाठी पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई यांचे आस्थापनेवर खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पदे वर्ग करून स्वतंत्र आस्थापना निर्माण करण्यास तसेच सदर आस्थापनेसाठी पोलीस उप आयुक्त,जलद प्रतिसाद पथक यांना "कार्यालय प्रमुख" व त्यांच्या अधिनस्त प्रशासकीय अधिकारी यांना " आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	पदनाम	पदसंख्या
१	प्रशासकीय अधिकारी	०१
२	वरिष्ठ लिपीक	०१
३	कनिष्ठ लिपीक	०२
४	रोखपाल	०१
	एकूण	०५

२. सदरचा शासन निर्णय, वित्त विभाग क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ च्या भाग पहिला, उपविभाग एक, अ.क्र.३, नियम क्र.२ व महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ भाग-२ परिच्छेद ८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर आस्थापनेकरिता येणारा आवश्यक खर्च मुख्यलेखाशिर्ष २०५५-पोलीस,उप लेखाशिर्ष-(०२)(०१)शहर पोलीस,(००)१०८-राज्य मुख्यालय पोलीस (२०५५००९७) या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७०६११५८४८८१२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KAILAS ARJUN GAIKWAD

Digitally signed by KAILAS ARJUN GAIKWAD
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=b31abfcb1894c4c597cc944f19a89f474e7b98a70 8cc03eb46cd241a604d42bb, postalCode=400032, street=MAIN BUILDING, 2ND FLOOR,MANTRALAY,MUMBAI, ou=HOME DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KAILAS ARJUN GAIKWAD
Date: 2019.07.06 12:05:14 +05'30'

(कैलास गायकवाड)
उप सचिव, गृह विभाग

प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

१. पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त,बृहन्मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
५. कक्ष अधिकारी, व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अर्थ शाखा गृह विभाग.
७. निवड नस्ती / पोल-३.